# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.

E-mail : desk2a@dte.org.in Internet :http/www.dtemaharashtra.gov.in

(2015-डिजीटाईज्ड कालबध्द सेवा वर्ष)


क्रमांक : २अ/एडीएम/२०१५/१९५८

दिनांक :

31 JUL 2015

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई / पुणे / नाशिक/ औरंगाबाद / नागपूर / अमरावती

विषय : शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्ग (शै.सा.मा.प्र.) Educationally and Socially Backword Category (ESBC) प्रवर्गांतर्गत केलेले प्रवेश विचारात घेऊन थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशप्रक्रियेसाठी रिक्त जागा कळविण्याबाबत.....

संदर्भ : संचालनालयाचे पत्र क्रमांक क्रमांक: २अ/एडीएम/२०१५/ ६६१, दिनांक ५.५.२०१५

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्ग (शै.सा.मा.प्र.) Educationally and Socially Backword Category (ESBC) आणि विशेष मागास प्रवर्ग (अ) (Special Backward Category -A) करिता आरक्षणाचे धोरण शासनाने लागू केले होते.

शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया सुरू झालेल्या होत्या. त्यामुळे प्रथम वर्ष अभियांत्रिकी आणि औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेमध्ये या प्रवर्गाचे आरक्षणाची अंमलबजावणी करण्यात आली नाही. तथापि वरील दोन्ही प्रवर्गातील (मराठा व मुस्लिम) उमेदवार केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया पार पडल्यानंतर रिक्त राहिलेल्या जागांवर सदर प्रवर्गातील पात्रता (eligibility) ही राखीव वर्गासाठी असलेल्या पात्रतेप्रमाणे ग्राहय धरून प्रवेश घेऊ शकतील असे संचालनालयाने अधिसूचना क्रमांक: २अ/एडीएम/ममुआरक्षण/२०१४/ १५४४,दिनांक १३.८.२०१४ अन्वये प्रसिध्द केले होते. त्यानुसार काही संस्थांनी संस्थास्तरावर रिक्त असलेल्या जागांवर या प्रवर्गातील उमेदवारांना प्रवेश दिले. तथापि या प्रवर्गातील काही उमेदवारांकडे संबंधित प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र,नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र , जात

वैधता प्रमाणपत्र नसल्यामुळे गुणवत्ता यादी पडताळणी करताना या उमेदवारांचे प्रवेश रद्द करून
संस्थांनी गुणवत्ता यादया प्रमाणित करून घेतल्या. दरम्यान शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग
क्रमांक संकीर्ण २०१५/प्र क्र ४३/तांशि-४, दि. १६.२.२०१५ अन्वये कळविल्यानुसार आणि शासन निर्णय
सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी २०१३/ प्र क्र ३५४/ भाग-२/ २०१३/१६-ब, दिनांक
२१.२.२०१५ मधील शासन निर्णयामध्ये परिच्छेद 'क' मध्ये नमूद केल्यानुसार दिनांक १४.११.२०१४
रोजी मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या स्थगिती आदेशापूर्वी ,शैक्षणिक संस्थांमध्ये शैक्षणिक व
सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्गासाठी असलेल्या आरक्षणांतर्गत झालेले प्रवेश अबाधित राहतील असे
निर्देश देण्यात आलेले असल्याने तुर्तात या संवर्गात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द केले जाणार
नाहीत व सदर विद्यार्थी परीक्षेस बसण्यापासून वंचित राहणार नाहीत याची खबरदारी घेण्यात यावी असे
संचालनालायाने संदर्भाधीन अधिसूचनेद्वारे क्रमांक: २अ/एडीएम/२०१५/ ६६१,दिनांक ५.५.२०१५
अन्वये कळविले होते.

शासनाच्या आरक्षणाच्या धोरणानुसार काही संस्थांनी या प्रवर्गातील उमेदवारांचे प्रवेश निश्चित
केले मात्र कागदपत्रांअभावी गुणवत्ता यादया प्रलंबित राहू नयेत म्हणून त्यांचे प्रवेश रद्द दर्शवून यादया
प्रमाणित करून घेतल्याचे विभागीय कार्यालय पुणे यांनी संचालनालयास कळविले आहे. याचप्रमाणे
इतरही विभागात प्रवेश झाले असण्याची शक्यता विचारात घेऊन या पत्राद्वारे कळविण्यात येते की,
आपल्या अधिनस्त असलेल्या संस्थांमध्ये ज्या संस्थांनी वरील दोन प्रवर्गातील उमेदवारांना प्रवेश
देऊन त्यांचे प्रवेश रद्द केले असतील मात्र शासनाच्या आदेशानुसार ते प्रवेश अबाधित ठेवले असतील
हे प्रवेश थेट द्वितीय वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी लॉग इन करताना पुढे घेता येत नसतील ,परिणामी
रिक्त जागांची संख्या निश्चित करता येत नसेल तर अशा प्रकरणी हे रद्द केलेले प्रवेश पुनर्स्थापित
करून त्यानंतर संस्थांनी त्यांच्या रिक्त जागा कळविणे अपेक्षित आहे. त्यासाठी आपल्या अधिनस्त
असलेल्या ज्या संस्थांनी त्यांचेकडील उपरोकत प्रवर्गातील उमदेवारांचे प्रवेश रद्द केले होते मात्र
शासनाच्या आदेशानुसार अबाधित ठेवले आहेत अशा संस्थांची माहिती व त्या उमदेवारांची नावे
,ॲप्लीकेशन आय डी घेऊन ती माहिती संचालनालयास तात्काळ email द्वारे
dtedesk2a@gmail.com वर उपलब्ध करून देण्यात यावी.

(दयानंद मेश्राम)
सहसंचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

क्रमांक:-विकाअ/शिक्षण/ESBC/२०१५/1922
सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती.
दिनांक 1 AUG 2015

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

प्रत :-१) प्राचार्य, सर्व पदवी संस्था यांना कळविण्यात येते की, वरील पत्रामध्ये उल्लेखीत केलेल्या प्रमाणे आपल्
संस्थेत कार्यवाही केली असल्यास अशा उमेदवारांची नावे/अप्लीकेशन आयडी या कार्यालयास ई-मेलव
तात्काळ कळविण्यात यावे.
२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना ई-मेल करण्याकरीता.